# वैर नको; सहयोग हवा

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. २४–०२–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

जिज्ञासा हा मानवी मनाचा गुणधर्मच आधुनिक विज्ञानाच्या नेत्रदीपक प्रगतीचं मूळ आहे. जिज्ञासा म्हणजे मनाला असलेली कुतूहलात्मक ओढ. या ओढीचे दोन भिन्न प्रकार आहेत. एक बहिर्मुख तर दुसरा अंतर्मुख. याच ठिकाणी अध्यात्म आणि आधुनिक विज्ञानाच्या नजरेत फरक पडतो. आधुनिक विज्ञान पूर्णत: बहिर्मुख आहे. या विज्ञानाच्या संशोधनात, देहापासून ब्रह्मांडापर्यंतच्या सर्व पंचमहाभूतात्मक गुढांची उकल करून घेण्याविषयीची जिज्ञासा आढळते. तर अध्यात्मात बाह्य जगताचा संपर्क तोडून, अंतर्मुख होऊन मनाच्या गूढ अशा परमोच्च अवस्थेविषयी जाणून घेण्याची जिज्ञासा असते. अध्यात्म असो की आधुनिक विज्ञान, अंतर्मुखता असो की बहिर्मुखता, दोहोंच्या जिज्ञासेचं उगमस्थान असतं ते मन. प्रत्येकाचं मन देहात बद्ध असतं. ज्याअर्थी जिज्ञासा मनात उत्पन्न होते, त्याअर्थी ज्ञानप्राप्तीची अभिलाषा देखील मनालाच असते. अर्थात ज्ञानप्राप्तीनंतर समाधान होतं तेही मनाचच. आता तुमच्या लक्षात आलंच असेल, की अध्यात्म असो की आधुनिक विज्ञान दोहोंच्याही जिज्ञासेचा मूलभूत घटक कोणता असेल तर तो म्हणजे मन. अध्यात्मात मनाची परमोच्च अवस्था प्राप्त झाली तर ती व्यक्ती आत्मानंदात रमेल. तिला त्या आनंदापुढे पंचमहाभूतात्मक देह नगण्य वाटेल. आत्मानंद ही मानसिक अवस्था आहे. आधुनिक विज्ञानाप्रमाणे ब्रह्मांडाची व्याप्ती आणि शक्ती यांचा त्यांनी वेध घेतला तरीही त्यांना आपला देह नगण्यच वाटेल. प्रत्येक शोधानंतर आनंद होईल, पण तो क्षणिक असेल. नंतर उरेल ते त्या शोधाच्या निष्कर्षाबद्दलचं समाधान. पुन्हा निर्माण होईल ती पुढील टप्प्याविषयीची जिज्ञासा. जिज्ञासा, समाधान, आनंद या भावना मनाशीच निगडित आहेत. एखाद्या गोष्टीविषयी जिज्ञासा उत्पन्न होऊन त्यावर संशोधन करण्याची इच्छा उत्पन्न होते ती देखील मनातच. तेव्हा अध्यात्म असो की आधुनिक विज्ञान असो त्याचा मूलभूत घटक जर मन आहे, तर मनाशी निगडित असलेल्या सर्व शाखांनी आपापला एकतर्फी हेका सोडून एकत्र येणं नितांत गरजेचं आहे. याच तत्त्वावर मनाचा सर्वांगीण विचार आपण या सदरात करणार आहोत.